गोंडवानाविद्यापीठ, गडचिरोली



मनोहरभाईशिक्षणप्रसारकमंडळ, आरमोरीद्वारासंचालित

# महात्मागांधीकला, विज्ञान व
# स्व. नसरूद्दीनभाईपंजवानीवाणिज्य महाविद्यालय

आरमोरी, जि. गडचिरोली

नॅकपुनर्मानांकित 'अ' दर्जा (3.02 CGPA)






# राष्ट्रीय सेवा योजना

## 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिर'

## Disaster Management Training & Awareness Camp

## अहवाल

दिनांक : १६ फेब्रुवारी व १७ फेब्रुवारी २०१८

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी

# 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिर'

## अहवाल २०१७-१८

शैक्षणिक विकासा सोबतच सामाजिक व सांस्कृतिक विकासाचे ध्येय समोर ठेवून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यां मध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी या उद्देशाने महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी येथे राष्ट्रीय सेवा योजना आणि शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली पुरस्कृत दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिराचे आयोजन केले होते.

आपत्तीमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी महत्त्वाची आहे. भूकंप, दुष्काळ, अतिवृष्टी, पूर, अपघात, आग लागणे अशा विविध आपत्तीचे प्रमाण वाढले असून अशा नैसर्गिक आपत्तींवर मात करता येण्याच्या दृष्टीने व विद्यार्थ्यांत सामाजिक बांधिलकी निर्माण होऊन सामाजिक उत्तरदायित्वातून उत्तम स्वयंसेवक निर्माण व्हावे या उद्दिष्टाने महाविद्यालयात दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

दि. १६ फेब्रुवारी २०१८ ला 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिराचा' उद्घाटन समारंभ पार पडला. उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, उद्घाटक म्हणून सहायक पोलीस निरीक्षक श्री. महारूद्र परजने तर अतिथी म्हणून आरमोरी तहसीलचे तहसीलदार श्री. यशवंत धाईत, प्राचार्यश्री. विनोद धारगावे, उपविभागीय जनसेवक श्री. संदीप लांजेवार, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. शशिकांत गेडाम, रासेयो प्रमुख डॉ. उत्तमचंद कांबळे आणि शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडा विभाग प्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे उपस्थित होते.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाची आवश्यकता स्पष्ट करून आपत्ती आल्यास केवळ शासनाच्या मदतीवर अवलंबून न राहता युवावर्गाने आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेऊन उत्तम स्वयंसेवक या नात्याने सामाजिक बांधिलकीतून समाज सेवा व एकूणच देशसेवेत हातभार लावावा असे सांगितले. सहायक पोलीस निरीक्षक श्री. महारूद्र परजने यांनी जीवनात येणाऱ्या आपत्तीला सामोरे जाण्यासाठी स्वत: सक्षम व्हावे व आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेऊन समाजसेवा करावी असे सांगितले. तर तहसीलदार श्री. यशवंत धाईत यांनी प्रशिक्षणार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

पहिल्या सत्रात शिबिराचे प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून मॅनेजर ऑपरेशन व मार्केटींग एस.एस.एस. असोसिएट्स नागपूर येथील श्री. मोझेश कोंडरा यांनी आगीमुळे निर्माण होणाऱ्या आपत्तींवर मात कसे करता येईल यावर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण स्वयंसेवकांना दिले. हे प्रशिक्षण देत असताना त्यांनी प्रात्याक्षिकासह आगीपासून बचाव कार्य करतानाच्या व्यवस्थापनाचे धडे दिले. याप्रसंगी भूकंप, पूर, ढगफूटी, वादळ, विजा, आग, वायूगळती, भूस्खलण, अपघात, फ्रॅक्चर, भाजणे, अशाविविध नैसर्गिक आपत्तींना सक्षमपणे कसे सामोरे जाता येईल याची माहिती चित्रफितीद्वारे देण्यात आली.

दुसऱ्या सत्रात एन.जी.ओ. गडचिरोली येथील रेडक्रॉस ट्रेनर श्री. अविनाश चटगुलवार यांनी अपघात झाल्यावर प्राथमिक उपचार म्हणून बॅंडेज कसे बांधले पाहिजे व बॅंडेजच्या विविध प्रकारां विषयी माहिती देवून स्वयंसेवकांकडून प्रात्याक्षिक करवून घेतले. तसेच अपघात दरम्यान येणाऱ्या आपत्तींवर मात कसे करता येईल याचे महत्व पटवून दिले.यावेळी त्यांनी आरोग्या विषयी मदत कार्य कसे करता येईल हे स्पष्ट केले. या शिबिरात महात्मा गांधी महाविद्यालय, हितकारिणी महाविद्यालय, आरमोरी, किसनराव खोब्रागडे महाविद्यालय, आरमोरी येथील एकूण १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

प्रास्ताविक डॉ. उत्तमचंद कांबळे, संचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी केले तर आभार प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे यांनी मानले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी रासेयो सदस्य प्रा. सीमा नागदेवे, प्रा. गजेंद्र कढव, डॉ. अमिता बन्नोरे, डॉ. चंद्रकांत डोर्लीकर, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. सतेंद्र सोनटक्के, डॉ. विजय गोरडे, प्रा. स्नेहा मोहुर्ले, प्रा. गजानन बोरकर, प्रा. दयाराम मेश्राम,प्रा. विनोद रामटेके,श्री. बाबुराव शेंडे, श्री. रमेश इन्कने, श्री. खुशाल रामटेके, श्री. प्रशांत दडमल, श्री. सचिन काळबांधे, सचिन ठाकरे यांनी सहकार्य केले.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

M.G. Arts, Science & late N.P. Commerce College Armori

प्राचार्य
PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli









श्री. अविनाश चटगुलवार एन.जी.ओ. गडचिरोलीचे रेडक्रॉस ट्रेनर बँडेजच्या विविध प्रकारा विषयी माहिती देतांना






प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून श्री. मोझेश कोंडरा मॅनेजर ऑपरेटर व मार्केटींग एस.एस.एस. असोसिएट्स नागपूर
शिबीरातील विद्यार्थ्यांना आगी पासुन बचाव प्रशिक्षण देतांना












आपत्ती व्यवस्थापण प्रशिक्षक श्री अविनाश चेटगुलवार श्री मोझेश कोंडा यांचा मोमेंटो देवुन सत्कार व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा. श्री. महारुद्र परजने, तहसीलदार श्री. यशवंत धाईत प्रा. डॉ.राजेंद्र घोनमोडे प्रा.ज्ञानेश्वर ठाकरे प्रा. डॉ.उत्तमचंद कांबळे,प्राडॉ. गजेंद्र कढव, प्रा. गजानन बोरकर

लोकमत
24-2-18

# आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

## आरमोरीत शिबिर : गोंडवाना विद्यापीठस्तरीय कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**आरमोरी :** आपत्तीमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी तसेच आपत्तीतून बचाव करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी महत्त्वाची आहे. भूकंप, दुष्काळ, अतिवृष्टी, पूर, अपघात, आग लागणे अशा विविध आपत्तींचे प्रमाण वाढले असून अशा नैसर्गिक आपत्तीवर मात करण्याच्या दृष्टीने व विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करणे गरजेचे आहे. शिवाय यातून उत्तम स्वयंसेवक निर्माण व्हावे, या उद्देशाने स्थानिक महात्मा गांधी महाविद्यालयात गोंडवाना विद्यापीठस्तरीय दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.



मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, मंचावर तहसीलदार धाईत.

शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या हस्ते झाले. यावेळी तहसीलदार यशवंत धाईत, सहायक पोलीस निरीक्षक महारुद्र परजने, प्राचार्य विनोद धारगावे, संदीप लांजेवार, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. शशिकांत गेडाम, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, डॉ. उत्तमचंद मुंगमोडे उपस्थित होते.

दोन दिवस चाललेल्या आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिरात प्रशिक्षक म्हणून मॅनेजर ऑपरेटर मार्केटिंग असोसिएट्स नागपूरचे मोझेश कोंडा, रेड क्रॉस ट्रेनर अविनाश चडगुलवार उपस्थित होते. कोंडा यांनी आगीमुळे कशाप्रकारे बचाव करता येईल याची प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली. तसेच भूकंप, पूर, ढगफुटी, वादळ, विजा, आग, वायूगळती, भूस्खलन, अपघात, फ्रॅक्चर, भाजणे, विंचू चावणे, साप चावणे अशा विविध नैसर्गिक आपत्तींना सामोरे कसे जाता येईल याची चित्रफितीद्वारे माहिती दिली. चडगुलवार यांनी प्राथमिक उपचार पद्धती सांगितली. प्रास्ताविक उत्तमचंद कांबळे, संचालन विजय रेवतकर तर आभार ज्ञानेश्वर ठाकरे यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा. सीमा नागदेवे, गजेंद्र कढव, अमिता बन्नोरे, चंद्रकांत डोर्लीकर, दिलीप घोनमोडे, सतेंद्र सोनटक्के, विजय गोरडे, स्नेहा मोहुर्ले, गजानन बोरकर, दयाराम मेश्राम, बाबुराव शेंडे, रमेश इंकणे, खुशाल रामटेके, प्रशांत दडमल, सचिन ठाकरे यांनी सहकार्य केले.

M.G. Arts, Science & late N.P. Commerce College ★ Armori ★

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli